लोकसत्ता पृ.पा.१

# रस्ते दुरुस्तीसाठी ४० कोटींचा खर्च

## द्विवार्षिक निविदेसाठी कंत्राटदारांची निवड

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर महापालिकेने रस्ते दुरुस्त करण्यासाठी पुढील दोन वर्षासाठी जवळपास चाळीस कोटींचा खर्च अपेक्षित केला आहे.त्यामुळे हे काम करण्यासाठी निविदा प्रक्रिया करून तीन कंत्राटदारांची निवड करण्याचा प्रशासकीय ठराव मंजुर करण्यात आला आहे.

महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करून शहरभरात रस्त्याची उभारणी केली आहे.मात्र अनेक वेळा जल वाहिनी, विद्युत वाहिनी व इतर सेवा वाहिन्या अंथरण्यासाठी तयार रस्त्यावर खोदकाम करण्याची वेळ येत असते. खोदकाम केलेले हे रस्ते वाहतुकीत बाधा ठरू लागतात. तसेच कामाच्या गुणवत्तेत तडजोड होत असल्यामुळे याच रस्त्यावर पावसात खड्ड्याची समस्या देखील उभी राहते. वेळोवेळी रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागावर आहे. त्यानुसार पुढील दोन वर्षात रस्ते

### खोदकाम करणाऱ्यांकडून शुल्क

**मिरा भाईंदर शहरात रस्त्यावर केल्या जाणाऱ्या खोदकामांवर महापालिकेकडून शुल्क आकरणी केली जाते.मागील मागील तेरा वर्षात यामुळे पालिका तिजोरीत ५०८ कोटी रुपयांची भर पडली आहे. तर यातील ४१६ कोटी रुपये हे खड्डे बुजावण्याच्या कामात खर्च करण्यात आले.असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.**

दुरुस्तीसाठी ४२ कोटी ३७ लाख २८ हजार अंदाजित खर्चाची निविदा पालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आली होती. यात ५.३८ टक्के कमी दराने श्रीजीईपीसी प्रायव्हेट लिमिटेड, मे गजानन कन्स्ट्रक्शन,आणि मे. बिटकॉन या संस्थेनी निविदा भरली होती. तिन्ही कंत्राटदाराचे पॅनल तयार करून कामास मान्यता देणारा प्रशासकीय ठराव आयुक्त संजय काटकर यांनी १५ ऑक्टोबर रोजी मंजुर केला आहे.

---

पुण्यनगरी पृ.पा.१

# कोचिंग क्लासमध्ये मारहाण, विद्यार्थिनीची मृत्यूशी झुंज

**। वसई :** क्लासमध्ये मस्ती करते म्हणून शिक्षीकेने केलेल्या मारहाणीत १० वर्षीय विद्यार्थिनीला गंभीर दुखापत झाली असून,अतिदक्षता विभागात तिच्यावर उपचार करण्यात येत आहे.

नालासोपारा पूर्वेच्या ओस्वालनगरी किराणा दुकान चालवणारे अंबाराम पटेल यांची १० वर्षांची मुलगी दीपिका ५ व्या इयत्तेत शिकते. याच परिसरात असलेल्या रिना क्लासेसमध्ये तिला शिकवणीसाठी घालण्यात आले होते. ती वर्गात मस्ती केल्यामुळे काही दिवसांपूर्वी क्लासमधील शिक्षिका रत्ना सिंग यांनी दीपिकाच्या कानाखाली जोरदार थप्पड मारली होती. यामुळे तिच्या कर्णफुलाचा मागील भाग कानाच्या पाठीमागील बाजूस लागून दुखापत झाली.

सुरुवातीला विरारच्या खासगी रुग्णालयात तिच्यावर उपचार करण्यात आले. मात्र दुखणे वाढल्याने १३ ऑक्टोबरला मुंबईच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या मारहाणीत तिच्या श्वासनलिकेसह मेंदूला इजा झाली असून, अतिदक्षता विभागात मागील आठ दिवसांपासून ती व्हेंटिलेटवर मृत्यूशी झुंज देत आहे. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात शिक्षिका रिनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

लोकमत पृ.पा.४

# रिवॉर्डच्या नादात महिलेने ५० हजार गमावले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** रिवॉर्ड पॉइंटची मुदत संपेल त्यामुळे आताच ७,६९० रुपयांच्या कॅशचा फायदा घेण्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करा, असे सांगत एका महिलेची ५० हजार रुपयांना फसवणूक झाल्याचा प्रकार मीरा रोड येथे घडला.

पूनम कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या ज्योती मालुसरे यांना अनोळखी क्रमांकावरून मेसेज आला. त्यांच्या एसबीआय योनो रिवॉर्ड पॉइंट रु. ७,६९० हे आज मुदतबाह्य होणार असल्याने ते पॉइंट कॅश करायचे असतील तर त्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करा. त्यांनी कॅशच्या आमिषाने लिंक क्लिक केली आणि त्यानंतर पुढील प्रक्रियेतून मालुसरे यांच्या बँक खात्यातून लुटारूंनी चलाखीने ५० हजार रुपये लुटले. नया नगर पोलिसांनी याप्रकरणी दोन मोबाइलधारक आणि १ लिंकधारक अशा तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु.प. ७.

# सूर्या प्रकल्पाच्या योजनेची कामे अद्याप सुरूच

## दिवाळी आली तरी मिरा-भाईंदरकरांना पाणी नाही

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** एमएमआरडीच्या सूर्या पाणी प्रकल्प योजनेतुन पहिल्या टप्प्यात मिरा-भाईंदरच्या नागरिकांना ४० दशलक्ष लिटर पाणी अद्याप शहराला मिळालेले नाही. गणेशोत्सवापूर्वी पहिल्या टप्प्यातील पाणी नागरिकांना देण्यात येईल, हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासनही फोल ठरले आहे.

मिरा-भाईंदर शहराची पाण्याची गरज ही स्टेम प्राधिकरण आणि एमआयडीसीकडून मंजूर असलेल्या एकूण २११ दशलक्ष लिटर पाण्याद्वारे भरून काढली जात आहे. मात्र मागील दीड वर्षांपासून या पुरवठ्यात जलवाहिनी फुटणे किंवा दुरुस्त करण्याच्या नावावर सातत्याने व्यत्यय निर्माण होत आहे. परिणामी शहरात तीव्र पाणीटंचाईची समस्या उभी राहत आहे. मिरा-भाईंदर शहरासाठी पालघरच्या सूर्या धरण प्रकल्प योजनेतुन अतिरिक्त २१८ दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा शासनाने मंजूर केला आहे.

मे महिन्यात प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मिरा-भाईंदरमध्ये आले होते. यावेळी मिरा-भाईंदरमधील पाण्याची समस्या दूर करण्यासाठी सूर्या प्रकल्प योजनेतून पहिल्या टप्प्यात गणेशोत्सवापूर्वी जवळपास ४० दशलक्ष लिटर पाणीसाठा केला जाणार असल्याची घोषणा केली होती. मात्र आता गणेशोत्सव उलटून दिवाळीजवळ आल्यानंतरही हा पाणीपुरवठा शहराला उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे शहरात पाणीटंचाईची समस्या कायम आहे.

### शहराला २१८ दशलक्ष लिटर

मिरा-भाईंदरसह वसई-विरार शहरासाठी एमएमआरडीए 'सूर्या धरण पाणी योजना' राबवत आहे. पहिल्या टप्प्यात वसई-विरार शहराचा पाणीपुरवठा सुरू झाला आहे व दुसऱ्या टप्प्यात मिरा-भाईंदर शहराला २१८ दशलक्ष लिटर पाणी दिले जाणार आहे. एमएमआरडीएकडून हा पाणीपुरवठा मिरा-भाईंदर शहराच्या वेशीवरच केला जाणार असून तेथून शहरांतर्गत पाणी वितरण व्यवस्था पालिकेकडून करण्यात येणार आहे. या पाणी वितरण व्यवस्थेतंर्गत राज्य शासनाने पालिकेला सुमारे ५१६ कोटींचा निधी मंजूर केला आहे. पालिकेकडून त्याच्या कामाला सुरुवात देखील करण्यात आली असून हे पाणी शहराच्या वेशीवर साठविण्यासाठी सुमारे ५० दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या दोन टाक्या (जलकुंभ) एमएमआरडीएकडून चेना येथे बांधण्यात येत आहेत. मात्र वनविभागाकडून आवश्यक परवानग्या आणि संथगतीने सुरु असलेल्या या कामामुळे यास अजून काही महिने लागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

---

# संकेतस्थळावरून फसवणूक

## रुपया पाठवायला सांगून ७३ हजार लंपास

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**




**वसई :** ऑनलाईन वस्तू खरेदी करणे मिरा रोडमधील एका इसमाला महागात पडले आहे. एका संकेतस्थळाने त्यांना वस्तू तर पाठवल्या नाहीत वर १ रुपया पाठवायला सांगून त्यांच्या खात्यातील ७३ हजार रुपये लंपास केले. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार अल्मास सरगुरू हे मिरा रोडमध्ये राहतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी एका संकेतस्थळावरून तेल, शॅम्पू असा १ हजार रुपयांच्या वस्तूची ऑनलाइन ऑर्डर दिली होती. मात्र त्या वस्तू त्यांना मिळाल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी कस्टमर केअरवर संपर्क साधला. त्यांनी ही रक्कम परत पाठविणार असल्याचे सांगितले. त्यासाठी ऑनलाईन १ रुपया पाठविण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार सरगुरू यांनी १ रुपया पाठवला.

मात्र सायबर भामट्यांनी त्यांच्या खात्यातील ७३ हजार रुपये लंपास केला. याबाबत नयानगर पोलीस ठाण्यात सदर संकेतस्थळाविरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.


Scanned with OKEN Scanner

लोकमत पु-पा-३.

# उत्तनमधील कोळीवाड्यांना समुद्रपातळी, उधाणाचा धोका

## मच्छीमारांमध्ये भीती : किनारपट्टीवरील पायवाटा, रस्ते, कोबे उखडले

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : ग्लोबल वॉर्मिंगसह खाडी-समुद्र परिसरातील क्षेत्रात प्रचंड प्रमाणात भराव व बांधकामांचा फटका भाईंदरच्या उत्तन भागातील समुद्र किनारी राहणाऱ्या मच्छीमारांना जाणवत आहे. समुद्राचे उधाण आणि वाढती पातळी यामुळे किनारपट्टीवरील काँक्रीट पायवाटा, रस्ते, कोबे उखडून घरांनाही धोका वाढला आहे.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. त्यातच खाडीपात्र, कांदळवन, भरती क्षेत्र, सीआरझेडसारख्या संवेदनशील अंडी संरक्षित क्षेत्रात प्रशासन व राजकारणी यांच्या आशीर्वादाने प्रचंड प्रमाणात बेकायदा कांदळवन तोड, भराव आणि बांधकामे होत आहेत. भराव झाल्याने त्यामुळे भरतीचे पाणी हे अन्य भागात शिरत आहे, तसेच पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढले आहे. तर पायवाटा-रस्ते उखडल्याने मच्छीमारांना किनाऱ्यावर ये-जा करणे जिकिरीचे बनले आहे.



उत्तन कोळीवाडा येथील समुद्र किनाऱ्यावरील रस्ते, पायवाटा या उधाण आणि वाढती पातळीमुळे उखडू लागल्या आहेत.

### बेकायदा भरणीचे गंभीर परिणाम लागतात भोगावे

यंदाच्या कोजागिरी पौर्णिमेवेळी समुद्राला मोठे उधाण आल्याने किनाऱ्यावरील पायवाटा, रस्ते, मासळी सुकवण्याच्या आणि ती वेगळी करण्याच्या जागा या उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे मच्छीमारांच्या त्रासात वाढ झाली आहे. या प्रकरणी महापालिकेस तात्काळ पायवाटा-रस्ते बांधून देण्याची मागणी केली आहे.

- शर्मिला बगाजी, माजी नगरसेविका

शहरातील अन्य खाडी व परिसरात बेकायदा भरणी केली जाण्याचे गंभीर परिणाम समुद्र किनाऱ्यावरील मच्छीमारांना भोगावे लागत आहेत. भरतीचे पाणी साचणाऱ्या भागात बेकायदा भराव आणि बांधकामे झाल्याने समुद्राचे पाणी मच्छीमारांच्या घरांना धडक देऊ लागले आहे. याची गंभीर दखल शासन, प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी घ्यावी.

- बर्नड डिमेलो, मच्छीमार नेते

### समुद्राच्या उधाणात घरे ढासळणार की काय?

- उत्तन समुद्रकिनारी उत्तन, पाली, चौक भागात मच्छीमारांचे कोळीवाडे आहेत. किनाऱ्यावर मच्छीमारांची घरे असून, किनाऱ्यास जाण्यासाठी काँक्रीटच्या पायवाटा, रस्ते बनवलेत. समुद्रातील बोटींवर मासेमारीसाठी लागणारे साहित्य नेण्यास, ये-जा करण्यास, पकडलेली मासळी आणण्यासाठी या पायवाटा-रस्त्यांचा वापर मच्छीमार करतात.
- मासळी सुकवण्यासाठी लाकडी स्टँड उभारलेत, तर काही ठिकाणी काँक्रीटचे कोबे आहेत, परंतु यंदाच्या कोजागिरी पौर्णिमेच्या वेळी आलेल्या मोठ्या उधाणाने येथील सिमेंट काँक्रीटच्या पायवाटा, रस्ते उद्ध्वस्त करून टाकले आहेत. सिमेंटच्या पायवाटा उखडून मोठे दगड उरले आहेत. अनेकांच्या घरांमध्ये समुद्राचे पाणी आल्याने मच्छीमार घाबरले आहेत. समुद्राच्या उधाणात घरेदेखील कमकुवत होऊन ढासळण्याची भीती निर्माण झाली आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार, आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : काशीगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आणि तिची बदनामी करण्याची धमकी देणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

काशिमीरा येथे राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणाने एका अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष दाखवून सतत अत्याचार केला. तसेच मुलीचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल करून तिची बदनामी केली. पीडितेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी तरुणावर पॉक्सोसह बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक सोनावणे अधिक तपास करीत आहेत.

लोकमत पु-पा-७.

# बसवाहकास शिवीगाळ

मीरा रोड : भाईंदरच्या उत्तन नाका येथे राहणारे मकसूद मोराद मुल्ला व मिथुन जाधव हे पालिकेच्या बसचे वाहक आहेत. जाधव हे बस डेपो व्यवस्थापकाचा फोन उचलत नसल्याने मुल्ला हे त्यांचा निरोप देण्यासाठी जाधव यांच्या घरी गेले. मुल्ला हे आपल्या घरी गेल्याचा राग येऊन जाधव याने मुल्ला यांना उत्तन नाक्यावर शिवीगाळ करीत धमकी दिली. मुल्ला यांच्या तक्रारीवरून उत्तन सागरी पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु-पा-१.

# मीरा-भाईंदरमध्ये १४ जणांनी घेतले अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून मंगळवारी १४ जणांनी एकूण ३८ उमेदवारी अर्ज नेले आहेत. त्यात आमदार गीता जैन यांच्या नावे भाजप, शिवसेना आणि अपक्ष म्हणून अर्ज नेले गेले आहेत. शिवाय भाजपच्या नावाने ॲड. रवी व्याससह माजी सभापती सुरेश खंडेलवाल यांनीही उमेदवारी अर्ज घेतले आहेत.

मंगळवारी उमेदवारी अर्ज देण्यास सुरुवात झाली. काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन यांच्या नावाने ४ अर्ज घेतले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आसिफ शेख यांनी २ अर्ज घेतले. शिंदेसेनेचे विक्रम प्रताप सिंह यांनी तीन अर्ज आणि त्यांच्या पत्नी निशा यांच्या नावाने १ उमेदवारी अर्ज नेण्यात आला आहे.

## भाजप-शिंदेसेनेत तिढा

- राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन निवडणूक मैदानात उतरलेले माजी उपनगराध्यक्ष अरुण कदम यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज घेतला आहे. भाजपतून बाहेर पडलेले हांसूकुमार पांडे यांनी अपक्ष म्हणून अर्ज घेतला. एकूण ९ जणांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज नेले आहेत.
- मीरा-भाईंदरच्या जागेवरुन भाजप व शिंदेसेनेत तिढा कायम आहे. त्यातच भाजपमध्ये उमेदवारीसाठी चुरस आहे. आ. गीता जैन यांनी भाजप, शिवसेना आणि अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज नेले आहेत.
- आ. जैन यांना एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेचे तिकीट देण्याचे वचन दिले असून भाजपला प्राधान्य असले तरी वरिष्ठ नेते ठरवतील त्यानुसार दोन्हीपैकी कोणत्याही एका पक्षातून त्या निवडणूक लढवणार आहेत.

# वेश्याव्यवसायप्रकरणी महिलेस केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या एका महिलेस अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पथकाने सापळा रचून अटक केली असून, एका पीडित महिलेची सुटका केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावर मानव वाइन शॉपमागील साई निकेतनमध्ये राहणारी अंकिता ऊर्फ आशा पांडुरंग मोरे ही महिला वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यांनी बोगस गिऱ्हाईक पाठवून तेथे सापळा रचला.

अंकिता हिने वेश्यागमनासाठी नालासोपारा येथील महिलेस बोलावले होते. तिच्या वेश्यागमनाच्या बोलीची रक्कम ठरवून तिने रक्कम घेतली. सापळा रचून असलेल्या पोलिस पथकाने अंकिता हिला अटक केली. २० ऑक्टोबर रोजी नवघर पोलिस ठाण्यात तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक अशोक कांबळे हे अधिक तपास करीत आहेत.

# घरातून दागिने चोरले



मीरा रोड : पेणकरपाडा येथे शांतीदेवी सिन्हा निवासमध्ये राहणारे राम लवट चरण सिंग हे घरात रात्री झोपले होते. पहाटे त्यांच्या घराचा दरवाजा उघडून चोरटा आत शिरला. त्याने घरातील सोन्याची चेन, कानातले, लॉकेट व रोख असा ५३ हजार १०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी काशिमीरा पोलिस ठाण्यात २१ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मीटर तोडल्याने केली मारहाण

मीरा रोड : विजेचा मीटर बॉक्स तोडल्याने वीज गेल्याबद्दल जाब विचारणाऱ्या महिला व तिच्या शेजाऱ्यास चौघांनी मारहाण केल्याची घटना काशिगाव येथे घडली. येथील श्री गणेश वेल्फेअर चाळीत राहणाऱ्या सोनी यादव व शेजारी वकील यादव यांच्या घरातील लाईट गेली होती. त्यांचा मीटर बॉक्स राहुल जयस्वाल याने तोडण्यास सांगितल्याने तो दुर्योधन यादव याने तोडला. त्याचा जाब विचारणाऱ्या वकील यादव यांना राहुल, दुर्योधन, जुमनू चौहान व रोहित जयस्वाल यांनी बांबूने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सोनी या सोडवण्यास गेल्या असता त्यांना वीट फेकून मारण्यात आली. लोक जमल्याने हल्लेखोर चौघे पळून गेले. चौघांवर पोलिसांनी २० ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा-१.

# मीरा-भाईंदरमधील भाजपमध्ये रस्सीखेच; अजित पवार गटात बंड

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अरुण कदम यांनी पदाचा राजीनामा देत अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून भाजपमधून निवडणूक लढवण्यास आमदार गीता जैन, माजी आमदार नरेंद्र मेहता व ॲड. रवी व्यास यांच्यात रस्सीखेच आहे. दुसरीकडे शिंदेसेनेनेही या मतदारसंघावर दावा केला आहे.

भाजप व शिंदेसेनेत खेचाखेची सुरू असताना अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि शासनाच्या नगरविकास विभागातील निवृत्त अधिकारी दिलीप घेवारे यांना भाजपमधून उमेदवारी देण्याची चर्चा सुरू झाली आहे.

## आजी-माजी आमदारांमधील वादाचीही चर्चा

एकमेकांची उणीदुणी काढणाऱ्या भाजपमधील स्थानिक नेत्यांबाबत कार्यकर्त्यांत नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, दिलीप घेवारे हे मीरा-भाईंदर शहरात अनेक वर्षे पालिकेच्या नगररचना विभागात अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या ते विशेष कार्य अधिकारी म्हणून महापालिकेत मानधनावर आहेत. घेवारे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपर्कात असल्याचे सांगण्यात आले.



हिंदू टास्क फोर्सचे अध्यक्ष ॲड. खुश खंडेलवाल यांनीही विधानसभेसाठी भाजपकडे उमेदवारी मागितली आहे. तसे पत्र त्यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

आजी-माजी आमदारांमधील गंभीर वादाचा फटका भाजपला बसू शकतो. त्यामुळे प्रखर हिंदुत्ववादी म्हणून मला उमेदवारी द्यावी, असे खंडेलवाल यांनी पत्रात म्हटले आहे. दुसरीकडे महायुतीमध्ये बिघाडी झाली असून, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मीरा-भाईंदर जिल्हाध्यक्ष अरुण कदम यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचे जाहीर केले आहे.

पुढारी पु.पा-३.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूटमार्च



**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मीरा भाईंदर वसई विरार पोलिस-आयुक्तालयातील मीरा भाईंदर झोन १ मधील काशीमीरा पोलिस ठाणे हद्दीत मंगळवारी सकाळी ११ वाजता रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या असुन येत्या २० नोव्हेंबर रोजी निवडणुक होणार आहे. निवडणुक शांततेत, निर्भयाने व नि:पक्षपाती वातावरणात पार पडाव्यात या काशीमीरा येथे रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते. लोकांच्या मनात विश्वास निर्माण व्हावा असा यामागचा उद्देश असल्याचे पोलिसांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीत मीरा भाईंदर मध्ये मतदानाची टक्केवारी कमी होती. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मीरा भाईंदर शहरातील मतदारांनी घराबाहेर पडून जास्तीत संख्येने मतदानाचा हक्क बजावावा असे पोलिस उप आयुक्त प्रकाश गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत ५-पा.१.

# आदर्श आचारसंहितेला बगल; इच्छुक उमेदवारांची पळवाट

## निवडणुकीआधी विविध कार्यक्रमांच्या आडून प्रचार अन् खर्च

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली असली तरी अजून उमेदवारी अर्ज भरला नसल्याची पळवाट काढत मीरा-भाईंदरमध्ये इच्छुकांनी विविध कार्यक्रमांच्या आडून प्रचार व खर्च चालवला आहे. विशेष म्हणजे प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी याकडे डोळेझाक करत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा १५ ऑक्टोबर रोजी झाल्यानंतर तेव्हापासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, राजकीय व्यक्ती, उमेदवार आदींना आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करणे अपेक्षित आहे; परंतु मीरा-भाईंदरमध्ये आदर्श आचारसंहितेच्या नाकावर टिच्चून शाब्दिक खेळ करत राजकारणी व इच्छुक उमेदवारांनी सर्रास विविध कार्यक्रमांच्या आड आपला राजकीय प्रचार चालवला आहे. धार्मिक आणि जातीय कार्यक्रमांचे आयोजनही केले जात आहे.




सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांसाठी आचारसंहितेचे नियम निकष लागत नाहीत, परंतु राजकीय कार्यक्रम असतील तर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास आवश्यक ती कारवाई केली जाईल. राजकीय स्वरूपाच्या कार्यक्रमांचा खर्च हा संबंधित उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जातो.

- सुनील भुताळे, निवडणूक निर्णय अधिकारी, मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघ

विधानसभा २०२४ लोकमत सुपर Vote

- विविध कार्यक्रमांतून जेवणावळी आणि अल्पोपाहार झोडला जात आहे. काही ठिकाणी भेटवस्तूंचे वाटप, तर काही ठिकाणी टोकन देऊन भेटवस्तू घरपोच केली गेल्याचे किस्से आहेत. अशा कार्यक्रमांचे आयोजन हे काही संस्थांच्या आड केले जात आहे.
- राजकीय पक्षांचे नाव आणि चिन्ह वापरून, तसेच नेत्यांची छायाचित्रे वापरूनही कार्यक्रम केले जात आहेत. अशा कार्यक्रमांतून मतदारांना प्रलोभन दाखवण्यापासून भेटवस्तू, जेवण-नाश्ता देऊन आकर्षित केले जात आहे. धार्मिक आणि जातीय आधारे त्यांना मत देण्यासाठी साद घातली जात आहे.
- संस्थांच्या आड व राजकीय पक्षाच्या नावाखाली होणाऱ्या या कार्यक्रमांवर लाखो रुपयांचा खर्च केला जात आहे. वास्तविक हे सर्व आदर्श आचारसंहितेमध्ये बसत नसले तरी अजून आम्ही उमेदवारी अर्ज भरला नाही, अशी पळवाट हे राजकारणी काढत आहेत. इतकेच काय तर होणारा खर्च आम्ही करत नसून संस्था करतात, असा दावा केला जात आहे.
- आदर्श आचारसंहितेचे पालन करणे हे राजकीय पक्ष व पदाधिकारी-कार्यकर्ते, राजकारणी, उमेदवार, लोकसेवक आदींना बंधनकारक आहे. तसे असतानाही शहरात सर्रास त्याचे उल्लंघन केले जात आहे. विशेष म्हणजे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपासून संबंधित महसूल, पोलिस, महापालिकांचे अधिकारी व कर्मचारी याकडे कानाडोळा करताना दिसत आहेत.

नवकाळ पा.नं.५

# भाईंदर पालिकेच्या नगरभवन तलावामध्ये मृत माशांचा खच

## संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी

■ भाईंदर

**मीरा-** भाईंदर पश्चिमेला असलेल्या पालिकेच्या नगरभवन तलावात गणेश उत्सव व नवरात्री उत्सवाच्या दरम्यान शासनाने बंदी घातलेल्या पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. त्यामुळे या तलावाचे पाणी दूषित व हिरवे झाले असून परिसरात मोठी दुर्गंधी पसरली आहे. या दुषित पाण्यामुळे जलचर प्राणी व मासे यांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू झाला आहे. मेलेले मासे तलावात तरंगत आहेत. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे आणि पर्यावरण विभागाचे आदेश डावलले गेल्याचा आरोप होत आहे. संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पर्यावरण प्रेमी यांनी केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने व शासनाच्या पर्यावरण विभागाने नैसर्गिक व सार्वजनिक तलावात बंदी असलेल्या पीओपीच्या मूर्ती विसर्जित करू नये, त्यासाठी दुसरीकडे कृत्रिम तलाव बांधून त्यामध्ये मूर्ती विसर्जित कराव्या व त्याचा मलबा काढून पालिकेने त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावावी असे आदेश दिले आहेत. मात्र महापालिकेने या आदेशाचे उल्लंघन करून माती व शाडूच्या मूर्तीसह सरसकट पीओपी मूर्ती व केमिकल युक्त साहित्य तलावात विसर्जित केले.


Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पु-पा-३.

# मिरा-भाईंदर शहरात पुन्हा धूळधाण

## बांधकामातील चिखल थेट वाहतुकीच्या रस्त्यावर

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**




मिरा-भाईंदर शहरात पुन्हा धुळीचे साम्राज्य पसरु लागल्याने त्याचा त्रास दुचाकीस्वारांसह पादचाऱ्यांना तसेच लहान मुले व वृद्धांना होऊ लागला आहे. अशातच शहरातील विविध भागांमध्ये गृहप्रकल्पाची बांधकामे मोठ्याप्रमाणात सुरु असून तेथील पार्यलिंगचा चिखल वाहून नेणाऱ्या डंपरमधून थेट रस्त्यावर पडू लागल्याने पावसात हे रस्ते चिखलमय होऊ लागले असून पाऊस न पडल्यास ते सुकून त्यातील धूळ वातावरणात पसरू लागली आहे. यामुळे लोकांना होणाऱ्या त्रासाकडे प्रशासनाचा मात्र हेतुपुरस्सर कानाडोळा होत असल्याचा आरोप लोकांकडून होऊ लागला आहे.

काही महिन्यांपूर्वी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये मोठ्याप्रमाणात सुरु असलेली बांधकामे तसेच ठिकठिकाणच्या आरएमसी (रेडी मिक्स कॉंक्रीट) प्रकल्पातून व खोदकामांमुळे वातावरणात मोठ्याप्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरल्याचा प्रत्यय शासनासह स्थानिक प्रशासनांना आला होता. या धुळीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार राज्यभर डिप क्लिन ड्राईव्ह मोहीम राबविली गेली. ती सध्या बंद झाल्याचे पहावला मिळत आहे. तसेच ठिकठिकाणच्या महापालिकांना केंद्र शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाकडून एनकॅप (नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम) योजनेंतर्गत वारेमाप अनुदानाचे सढळ हस्ते वाटप करण्यात आले. यापैकी मिरा-भाईंदर महापालिकेला सुमारे ८० कोटींहून अधिक अनुदान प्राप्त झाले. त्यातून पालिकेने वातावरणातील धुळीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पाण्याचा फवारा मारणारी यंत्रे लाखो रुपयांना खरेदी केली. यातील एक वाहन केव्हा तरी उडणाऱ्या धूळीवर पाण्याचा फवारा मारताना दिसते तर इतर यंत्रे धूळ खातच पडली आहेत.

पुढारी पु-पा-२.

# वसईच्या सातीवलीत भिंत कोसळली

**खानिवडे :** वसई पूर्वेतील सातिवली, दामूपाडा येथे नैतिक औद्योगिक वसाहतीतील निकृष्ट दर्जाची बांधलेली एक भिंत कोसळून लगत असलेल्या वस्तीतील तीन खोल्यांवर पडली. २१ आक्टोबर च्या संध्याकाळी घडलेल्या या घटनेत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. मात्र त्या खोल्या जवळपास नष्ट झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. सदर घटना समजल्यानंतर ह्या विभागातील आमदार राजेश पाटील, पोलीस यंत्रणा, महानगरपालिकेचे जी प्रभागतील अधिकारी व कर्मचारी ह्यांच्या सह घटना स्थळी तातडीने पोहचले व पाहणी केली. यावेळेस घटना स्थळी असलेल्या औद्योगिक वसाहतीच्या मालकावर कठोर कार्यवाई करून पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे तसेच ज्या भितीमुळे गोर गरिबांच्या खोल्या उद्ध्वस्थ झाल्या आहेत त्यांना तातडीने त्या बांधून देण्याचे औद्योगिक मालकास सांगण्यात आले. दरम्यान सदर दामूपाडा वस्तीचा पारंपरिक रस्ता हा अनेक दिवस ह्या औद्योगिक मालकाने बंद केले होता. हा रस्ता सुद्धा औद्योगिक मालकाला सांगून परत चालू करून देण्याचे सांगण्यात आल्यानंतर रस्ता चालू करून देण्याचे व नष्ट खोल्या बांधून देणार आहे असे सांगितल्याचे आ.पाटील यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

सामना पा. नं. ६.

# मीरा-भाईंदरच्या १२ मैदानांवर फटाकाप्रेमींची गर्दी उसळणार

**पालिकेने दिली परवानगी**

भाईंदर, दि. २२ ( सा. वा. ) - दिवाळी जवळ आली की बच्चेकंपनीला चाहूल लागते ती फटाके उडवण्याची. त्याची तयारी आतापासूनच सुरू झाली असून मीरा-भाईंदरमधील १२ मोकळ्या मैदानांवर फटाक्यांच्या विक्रीसाठी महापालिकेने परवानगी दिली आहे. विक्रीचे परवाने देण्यासही सुरुवात झाली असून ही परवानगी देताना अटी-शर्थींचे पालन करण्यास सक्ती केली आहे. फटाक्यांच्या विक्रीतून पालिकेला महसूलदेखील मिळणार आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शहरातील मोकळ्या मैदानावर फटाके विक्री करण्यासाठी परवाने देण्यात येणार आहेत. त्यासाठी सुभाषचंद्र बोस मैदानासमोरील जागा, रॉयल गार्डन मैदान, या ठिकाणी २० ते २५ स्टॉल लावता येणार आहेत. नवघर शाळा मैदान, जैसल पार्क चौपाटीजवळ, तेंडुलकर मैदान या ठिकाणी २० ते २५ स्टॉल्स लावता येतील. पोलीस आयुक्तालय मैदान, कनकिया पोलीस स्टेशनच्या मागे, सेव्हन स्क्वेअर शाळेजवळील मोकळे मैदान, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदान, सरदार वल्लभभाई पटेल महापालिका मैदान, शांतीनगर सेक्टर २ मधील मैदान, गणेश मंदिर मैदान, एमआयडीसी रोड येथे यंदा फटाक्यांची दुकाने लावण्यास परवागनी दिली आहे. नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मीरा-भाईंदर पालिकेचे आयुक्त संजय काटकर यांनी केले आहे.

### गल्लीबोळात बेकायदा स्टॉल्स

महापालिकेने यंदा १२ मैदानांवरच फटाक्यांची अधिकृत विक्री करण्याची परवानगी दिली असली तरी गल्लीबोळातही बेकायदेशीरपणे स्टॉल्स लावण्यात येत आहेत. त्यामुळे ऐन गर्दीच्या ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. भाजी मार्केट, पंडित भीमसेन जोशी रुग्णालयासमोर फटाके विक्री स्टॉल लावले जातात. यावर कोणतीही कारवाई न करता त्यांना पालिका अधिकारी व अग्निशमन दलाकडून पाठीशी घातले जात असल्याचा आरोप होत आहे.

सामना पा. नं. ७.

न्यायालयाने झापल्यानंतरही पालिकेचा कानाडोळा

# इमारत बांधणीच्या धुळीने भाईंदरकर घुसमटले

- प्रशासनाची मार्गदर्शक तत्त्वे कागदावरच
- अधिकारी, बिल्डरांचे साटेलोटे

भाईंदर, दि. २२ (सा.वा.) - आरएमसी प्लांट व नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतींमुळे होणाऱ्या धूळ प्रदूषणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने मीरा-भाईंदर पालिकेला झापले होते. मात्र अधिकारी व बिल्डरांच्या साटेलोट्यामुळे बांधकाम व्यावसायिकांसाठी आखून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे कागदावरच राहिली असून नियम धाब्यावर बसवून केल्या जाणाऱ्या बांधकामाने उडत असलेल्या धुळीने मीरा-भाईंदरकर अक्षरशः घुसमटले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी होत आहे.



न्यायालयाच्या दणक्यानंतर २०२३ मध्ये पालिका आयुक्त संजय काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाने नेमलेल्या विशेष पथकाकडून धूळ प्रदूषण करणाऱ्या निर्माणाधीन बांधकाम साईटची झाडाझडती घेतली होती. यावेळी पर्यावरण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या बिल्डरांवर कारवाईचा बडगा उगारतानाच संबंधीत साईट सील करण्याचा इशारा दिला होता. मात्र पालिकेची ही कारवाई काही दिवसांपुरतीच मर्यादित राहिली असून काही भ्रष्ट अधिकारी व बिल्डरांच्या साटेलोट्यामुळे पुन्हा एकदा शहरात हवा प्रदूषण वाढले आहे. खुलेआम नियम पायदळी तुडवले जात असतानादेखील कारवाई केली जात नसल्याने या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी असा संताप व्यक्त केला आहे.

### नेमकी काय खबरदारी घेणे गरजेचे आहे?

हवा प्रदूषण रोखण्यासाठी न्यायालयाच्या आदेशानंतर पालिकेने मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली होती. त्यानुसार ज्या ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे त्या ठिकाणी ३५ फूट उंचीचे पत्रे लावणे गरजेचे आहे. तसेच कापडाचे आच्छादन असावे. बांधकाम साहित्य वाहून नेणारी वाहने झाकलेली असावी. मातीने बरबटलेले टायर साईटवरच धुऊन मगच हे ट्रक रस्त्यावर न्यावेत. बांधकाम प्रकल्पाच्या

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं.५.

# आधे शहर में घमासान, आधा सुनसान

## ▪ मीरा-भायंदर के मतदाताओं को है उम्मीदवारों का इंतजार

अनिल चौहान | भायंदर


गीता जैन


नरेंद्र मेहता


रवि व्यास


प्रताप सरनाईक

मीरा-भायंदर मनपा क्षेत्र दो विधानसभा सीट में बंटा हुआ है। जिसमें से मीरा-भायंदर विधानसभा क्षेत्र का पूरा और ओवला-माजीवाडा विधानसभा क्षेत्र का आधा हिस्सा इस शहर में आता है। मीरा-भायंदर विधानसभा सीट से महायुति प्रत्याशी को लेकर खुद भाजपा में और उसके सहयोगी शिवसेना (शिंदे) के बीच में घमासान मचा हुआ है, जबकि ओवला-माजीवाडा विधानसभा क्षेत्र शिवसेना (शिंदे) ने प्रताप सरनाईक को उम्मीदवार घोषित कर दिया है।

ओवला-माजीवाडा विधानसभा क्षेत्र से हैट्रिक लगा चुके वर्तमान विधायक प्रताप सरनाईक का इस सीट से एक बार फिर शिवसेना (शिंदे) से लड़ेंगे। उनके सामने ठाणे के पूर्व उपमहापौर नरेश मनेरा शिवसेना (उद्धव) से मैदान में उतारने की तैयारी की है, लेकिन वे मीरा-भायंदर में आज तक नजर नहीं आए और न ही उनके चुनावी कार्यालय दिख रहे हैं। मीरा-भायंदर विधानसभा सीट पर महाविकास आघाडी से कांग्रेस के प्रदेश कार्याध्यक्ष मुजफ्फर हुसैन की चुनाव लड़ने की पूरी तैयारी है। उन्होंने अपना चुनावी गीत भी लॉन्च कर दिया है। लोगों से जनसंपर्क और छोटे-छोटे कार्यक्रम भी कर रहे हैं। वहीं, महायुति में प्रत्याशी फाइनल करने को लेकर अभी खींचतान ही चालू है, जबकि मंगलवार से नामांकन प्रक्रिया शुरू हो चुकी है, लेकिन अभी तक यही तय नहीं हो पाया है कि यह सीट भाजपा के पास रहेगी या शिवसेना (शिंदे) के पास चली जाएगी।

**सोशल मीडिया पर टिकट हो रहा पक्का:** पूर्व विधायक नरेंद्र मेहता और विधानसभा चुनाव प्रमुख एडवोकेट रवि व्यास भाजपा से तथा निर्दलीय विधायक गीता जैन भाजपा-शिवसेना दोनों से ही टिकट की आस लगाए बैठी है। तीनों के समर्थक अजीब सी दुविधा में हैं और उनकी धड़कने बढ़ी हुई हैं। ऊपर से सबसे तेज के चक्कर में कुछ लोग सूत्र के हवाले से सोशल मीडिया किसी न किसी का टिकट पक्का कर दे रहे हैं। जिसे देख-सुनकर विरोधी दावेदार के समर्थकों के हाथ-पांव फूल जाते हैं।

**मतदाताओं को रिझाने में लगे हैं नेता:** मीरा-भायंदर विधान सभा क्षेत्र के तीनों ही इच्छुक दावेदार जनसंपर्क, सभा, कार्यक्रम लेकर मतदाताओं को रिझाने में लगे हैं। नरेंद्र मेहता ने संकल्प सभा में रिकॉर्ड भीड़ जुटाकर अपनी शक्ति का लोहा मनवा दिया है। जमीनी स्तर पर भी उनके व्यापक और मजबूत कार्यक्रम चल रहे हैं। रवि व्यास की अंदरखाने से तैयारी चल रही है। प्रचार के मामले में जैन भी पीछे नहीं हैं।

# शिंदे शिवसेना के कोटे में मीरा-भाईदर विस सीट..!

## विधायक गीता जैन की लग सकती है लॉटरी

← नवभारत पा.नं.३





■ मीरा/भाईदर (सं). महाराष्ट्र में विधानसभा चुनाव की घोषणा हुए 9 दिन बीत चुके हैं, लेकिन महायुति और महाविकास आघाड़ी में टिकट बंटवारे को लेकर अभी तक सभी सीटों पर सहमति नहीं बन पाई है. हालांकि महायुति के सबसे बड़े घटक दल बीजेपी ने अपने 99 उम्मीदवारों की पहली अधिकृत सूची जारी कर दी है.जिसमें ठाणे लोकसभा निर्वाचन क्षेत्र अंतर्गत आने वाले 6 विधानसभा सीटों में से 3 सीटों, 148 ठाणे विधानसभा सीट से संजय केलकर, 150 एरोली विधानसभा सीट से गणेश नाईक और 151 बेलापुर विधानसभा सीट से मंदा विजय म्हात्रे को बीजेपी ने अपना अधिकृत उम्मीदवार घोषित कर दिया है. इससे कयास लगाया जा रहा है कि बची हुई 3 सीटें राज्य के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे का गृह क्षेत्र होने के कारण 147 कोपरी - पाचपाखाडी, 146 ओवला-माजीवाड़ा और 145 मीरा-भाईदर विधानसभा सीट शिंदे शिवसेना के कोटे में जा सकती है.

### मनपा की सत्ता पर काबिज थी बीजेपी

महायुति में अगर इस समीकरण पर अंतिम मुहर लग गई तो वर्तमान निर्दलीय विधायक गीता भरत जैन के टिकट की लॉटरी मीरा-भाईदर विधानसभा सीट से लग सकती है. बता दें कि मुंबई की सीमा से सटे और तेजी से विकसित होने के कारण मीरा-भाईदर विधानसभा सीट का राजनीतिक महत्व भी बढ़ गया है. मीरा-भाईदर मनपा में 2022 से प्रशासक राज शुरू होने से पहले मनपा की सत्ता पर बीजेपी काबिज थी. 2017 में हुए मनपा चुनाव में बीजेपी ने 95 वार्डों में से 61 सीटों पर बंपर जीत दर्ज की थी.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# शिक्षिका की पिटाई से छात्रा पहुंची अस्पताल

■ आईसीयू में चल रहा उपचार, हालत चिंताजनक

भास्कर संवाददाता | वसई

दैनिक भास्कर
पा. नं. ५

नालासोपारा में निजी क्लासेस में पढ़ाई करने गई एक छात्रा की टीचर ने पिटाई कर दी। इस घटना में उसके कान के परदे फट गए। पीड़ित छात्रा का मुंबई के एक निजी अस्पताल में उपचार चल रहा है, जहां उसकी हालत गंभीर बताई जा रही है। फिलहाल इस मामले में छात्रा के पिता ने तुलिंज पुलिस स्टेशन में टीचर के खिलाफ शिकायत दर्ज करवाई है।

पुलिस ने बताया कि 10 वर्षीय पीड़ित छात्रा दीपिका पटेल नालासोपारा (पूर्व) ओसवाल नगरी की निवासी है। दीपिका पांचवीं कक्षा में पढ़ती है। उसके पिता अंबाराम पटेल नालासोपारा (पूर्व) के ओसवाल नगर में किराने की दुकान चलाते हैं। दीपिका ट्यूशन के लिए इलाके के स्थित रीना क्लासेज में जाती है। पांच अक्टूबर को जब वह क्लास में मस्ती कर रही थी, तभी



ट्यूशन टीचर रत्ना सिंह ने दीपिका के दाहिने कान के नीचे जोर से थप्पड़ मार दिया। इससे उसके कान के पीछे के हिस्से में चोट लग गई और कान के परदे फट गए। कान और गर्दन में सूजन आ गई और जोर से दर्द होने लगा। परिजन ने शुरुआत में उनका इलाज विरार के एक निजी अस्पताल में कराया, लेकिन दीपिका का दर्द कम नहीं हो रहा था। बेटी की हालत देखकर पिता ने 13 अक्टूबर को मुंबई के एक निजी अस्पताल में भर्ती कराया है।

**इलाज का रोज 25 हजार रुपए खर्चः** दीपिका के पिता अंबाराम पटेल ने बताया कि टीचर की पिटाई से मेरी बेटी के कान के परदे फट गए हैं। अस्पताल के आईसीयू में उसका इलाज चल रहा है। डॉक्टरों ने उसे वेंटिलेटर पर रखा है। इलाज का रोज 25 हजार रुपए खर्च आ रहा है। हमारी आर्थिक स्थिति ठीक नहीं होने के कारण हम सामाजिक संस्था से मदद मांग रहे हैं। उन्होंने मांग की कि मेरी बेटी को पीटने वाली शिक्षक के खिलाफ सख्त कार्रवाई होनी चाहिए।

टीचर रत्ना सिंह के खिलाफ मामला दर्ज किया गया है। हमने संबंधित शिक्षक को नोटिस भेजा है और आगे की जांच चल रही है।
- शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पुलिस निरीक्षक, तुलिंज पुलिस स्टेशन

# मुंबई-अहमदाबाद हाइवे के ढाबों में लग रहे हुक्के के कश!

HBT
पा. नं. ४



■ **निसं, वसई:** नायगांव पुलिस स्टेशन क्षेत्र के अंतर्गत मुंबई-अहमदाबाद हाइवे के किनारे ढाबों में कानून को ठेंगा दिखाकर खुलेआम हुक्का पार्लर संचालित हो रहे हैं। देर रात तक चलनेवाले इन पुक्का पार्लर के बारे में लोकल पुलिस प्रशासन को कोई जानकारी नहीं है। स्थानीय लोगों का आरोप है कि इन हुक्का पार्लरों में युवा वर्ग नशे की चपेट में आकर अपना दम घोंट रही है। पुलिस के संज्ञान में होते हुए भी इस अवैध कारोबार पर कोई कार्रवाई नहीं की जा रही है।

ढाबों में खुलेआम चलाए जा रहे हैं हुक्का पार्लर, लेकिन पुलिस प्रशासन को पता नहीं

जानकारी के अनुसार, मुंबई-अहमदाबाद हाइवे पर खुलेआम हुक्का पार्लर संचालित हो रहे हैं। नायगांव स्थित ससु नवघर व मालजी पाडा इलाके में कई होटल और ढाबे हैं, जहां अवैध रूप से हुक्का बार खुल गए हैं और यहां पर बिना परमिशन की शराब पिलाई जाती है। यह क्षेत्र गुटखा तस्करी का भी अड्डा बन गया है। मीरा भाईंदर - वसई विरार आयुक्तालय के पूर्व पुलिस कमिश्नर सदानंद दाते ने इस तरह की अवैध गतिविधियों पर लगाम कसने के लिए नायगांव पुलिस स्टेशन को मंजूरी दी थी, लेकिन उनके तबादले के बाद यहां क्राइम का ग्राफ भी तेजी से बढ़ा है। गाइडलाइंस के मुताबिक, हाइवे पर रात डेढ़ बजे तक ही होटलों को खुले रहने की परमिशन है, जबकि यहां रात भर होटल खुले रहते हैं। मुंबई में हुक्का पर पाबंदी होने की वजह से इस इलाके में धड़ल्ले से हुक्का बार खुल रहे हैं। बड़ी संख्या में लोग यहां हुक्का पीने आते हैं।

शिवसेना यूबीटी के नेता सुरेंद्र राज ने बताया कि पुलिस की अनदेखी के चलते नायगांव नशे का हब बनता जा रहा है। नैशनल हाइवे पर इस तरह नशे का कारोबार चलता है, लेकिन पुलिस प्रशासन कोई कार्रवाई नहीं करता। पुलिस कमिश्नर को इसे संज्ञान में लेते हुए कार्रवाई करनी चाहिए।

“ मुझे इस बारे में जानकारी नहीं है, पुलिस टीम को भेजकर कार्रवाई की जाएगी।
- रमेश भामे, सीनियर पीआई, नायगांव

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

नवराष्ट्र

पोलिस विभागाने कसली कंबर • निवडणुकीत कोणताही अनुचित घटना घडू नये म्हणून तत्पर

# विधानसभा निवडणुकीसाठी पोलिसांचा रूट मार्च

भाईंदर, (वा.) येत्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये म्हणून पोलिस विभागाने कंबर कसली आहे. आगामी विधानसभा निवडणुकी २०२४ च्या पार्श्वभूमीवर नुकत्याच लागलेल्या आचारसंहितेच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनात परिमंडळ क्र. १ चे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी, विभागात काहीही चुकीची घटना घडू नये यासाठी पोलिसांचे महत्त्वाचे पाऊल उचलत शिस्त पद्धतीने मोठ्या फौजफाट्यासह परिमंडळांतर्गत रूट मार्च काढला. आगामी निवडणूक शांततेत पार पडावी म्हणून पोलिस विभागाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. गुन्हेगार आणि असामाजिक तत्वांवर दबाव निर्माण करण्यासाठी पोलिस अनेक उपाययोजना करत आहेत. लोकांच्या मनात विश्वास निर्माण व्हावा, या मागचा हेतू आहे. तसेच यावेळी कायदा सुव्यवस्थेचा पालन करावे, कोणी जातीय व सामाजिक तेढ निर्माण करणारे व सोशल मीडियावर एखादा मेसेज येत असेल व वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर लाऊन ज्यानी कायदा सुव्यवस्था बिघडत असेल तर त्वरित नागरिकांनी पोलीस हेल्पलाइन नंबर वर संपर्क साधावा.



## सीआरपीएफच्या काही तुकड्या, पोलिस, कर्मचाऱ्यांचा समावेश

नागरिकांनी कोणत्याही मोहाला बळी न पडता कायद्याचे पालन करत कोणत्याही प्रकारचे कायद्याचे उल्लंघन न करता बिनधास्त १०० टक्के मतदान करावे. असेही आवाहन करण्यात आले होते. पोलिस आयुक्तमधुकर पांडे यांच्या आदेशाने व परिशिष्ट १ पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सीआरपीएफ यांच्या काहि तुकड्या, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा रूट मार्चमध्ये समावेश होता.

Scanned with OKEN Scanner

Hindustan Times p-3

# Teacher's slap lands girl in ICU

**Deepika Patel, 10, sustained severe brain injury and respiratory failure; teacher booked**

**Megha Sood**
megha.sood@hindustantimes.com

**MUMBAI:** For the past eight days, 10-year-old Deepika Patel from Nalasopara has been fighting for her life after her teacher hit her under her ear during tuition classes.

Deepika, a Class 5 student, has been admitted to the intensive care unit of the KJ Somaiya Hospital in Sion with severe brain injury, tetanus toxicity and respiratory failure, and is on mechanical ventilation.

On October 5, Deepika had gone for private tuition classes when her tutor, 20-year-old Ratna Singh, slapped her twice under her right ear because she was supposedly laughing and being mischievous, said her father, Ambadas Patel, 32, in his police complaint.

Deepika, whose ear began hurting, returned home and told her mother what had happened. Her mother then went to the tuition centre and confronted Singh, who told her that she slapped Deepika because she was disturbing other children, according to the complaint.

Her mother and Singh then took Deepika to the Balaji Clinic in Tulinj, where she was given medicines. When they returned home in the evening, Patel noticed swelling near Deepika's ear. He then rushed her to the Sanjeevani Hospital, where she was admitted for a day. However, her face began swelling and Deepika was soon unable to even open her mouth.

"We had to keep a spoon between her lips to feed her water," said Patel. "For three days, Deepika was unable to eat or drink anything. That made her restless and we then took her to a government hospital in Mumbai. But since there were no ICU beds available, we admitted her to KJ Somaiya Hospital on October 13 through an acquaintance," said 32-year-old Ambadas.



Deepika Patel is on mechanical ventilation.



> We had to keep a spoon between her lips to feed her water. For three days, Deepika was unable to eat or drink anything
>
> **AMBADAS PATEL,** Deepika's father

"She is undergoing treatment that costs around ₹25,000 per day. As we are not financially sound, we are asking for help from social organisations," added Patel, who owns a general store in Oswal Nagar in Nalasopara East.

Patel approached the Tulinj police on Monday. Based on his complaint, an FIR was registered against Singh. "We have not received a single call from the tuition class owner, and we want them to be booked for putting my daughter through hell," he said.

Based on Patel's statement, the Tulinj police station has registered a case against Singh under sections 125 (endangering life or personal safety of others) of the Bharatiya Nyaya Sanhita and Section 75 (cruelty to child) of the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act against Ratna Singh. "We have sent a notice to the concerned teacher, and further investigation is underway," said sub-inspector Vinod Wayangankar of Tulinj Police Station.

Remarks

Hindustan Times P-2

# 10-YEAR-OLD GIRL LANDS IN ICU AFTER TEACHER'S SLAP

**Megha Sood**
megha.sood@hindustantimes.com

**MUMBAI :** For the past eight days, 10-year-old Deepika Patel from Nalasopara has been fighting for her life after her teacher hit her on her ear during tuition classes.


Deepika, a Class 5 student, has been admitted to the ICU of the KJ Somaiya Hospital in Sion with severe brain injury, tetanus toxicity and respiratory failure, and is on mechanical ventilation.

On October 5, Deepika had gone for private tuition classes when her tutor, 20-year-old Ratna Singh, slapped her twice on her right ear because she was supposedly laughing and being mischievous, her father, Ambadas Patel told the police. The Tulinj police have registered a case against Singh. →P3

Mid day - P-6

# Girl, 10, battles for life after being slapped by tutor

## Poor primary treatment worsened child's tetanus infection, which occured due to injury caused by earring after she was struck; coaching class teacher booked



Student who was allegedly slapped by her teacher for being mischievous; (right) her swollen right ear after the injury got infected

**SAMIULLAH KHAN**
samiullah.khan@mid-day.com

A 10-YEAR-old student studying in Std V is fighting for her life after a slap from her coaching class teacher. The slap struck her right ear and caused a wound, aggravated by the earring she was wearing. The injury allegedly led to a tetanus infection. The girl has been unconscious and receiving treatment in the ICU of a private hospital in Chunabhatti since October 13, with doctors working tirelessly to save her. The victim's father holds the woman teacher responsible for his daughter's critical condition and has complained to the Tulinj police station. » P02

**OCT 13**
Day the girl was admitted to ICU

# 2 freed after 9 years in jail, as court slams botched investigation

**EXCLUSIVE** >> Lack of evidence and motive leads to acquittal in Nalasopara murder case; families criticise authorities over false implication

**DIWAKAR SHARMA**
diwakar.sharma@mid-day.com



Abhijeet Mishra; Ravi Dangur, the acquitted youth; advocate Darshana Tripathy, Dangur's lawyer. PICS/HANIF PATEL

TWO youths, after spending almost nine years in Thane jail in connection with a murder case, walked free as a Vasai court acquitted them due to a severe lack of evidence and motive. Their relatives thanked the court for the acquittal but said that their youth was destroyed as they were "falsely implicated" in the case.

A 21-year-old milk businessman, Subhashchand Gupta, was found dead at a house in Nalasopara on March 17, 2016. His body was stuffed in a gunny bag, with a nylon rope found nearby. His elder brother Chandrashekhar Gupta registered an FIR at the Tulinj police station against four people, including two juveniles. Subsequently, two suspects—Ravi Dangur and Abhijeet Mishra—were arrested.

The prime suspect, Shiva Bhaiya, remained at large until last year when the Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) police arrested him in Uttar Pradesh. The remaining two suspects were juveniles and were not arrested but handled according to juvenile law.

**MAR 17**
Day in 2016 that the body was found

## 'Botched investigation'

Complainant Chandrashekhar Gupta told mid-day that two officers had investigated the case before the charge sheet was filed. "Initially, inspector Kiran Kabadi investigated the case, and later senior inspector Prakash Virajdar took over and filed the charge sheet in Vasai court.

However, they failed to retrieve call data records, CCTV footage, or other incriminating evidence to convict the killers of my brother," Chandrashekhar said.

"Despite two inspector-level officers working on the case, they couldn't even establish the motive behind the murder. Now, with the killers set free due to this botched investigation, we are worried for our safety," he added.

"My brother was killed just a month after his wedding. His widow is still devastated, and she refuses to remarry. The killers destroyed two lives, yet they have been acquitted. All thanks to the Tulinj police officers," he said.

"My brother deserves justice, and I won't let the matter rest. I will challenge the verdict in the high court to seek justice," vowed Chandrashekhar.

## Emotional moment at court

After the judge acquitted Dangur and Mishra on Monday, their parents' broke into tears at the Vasai court. They were seen touching the feet of the advocates and hugging each other with joy.

Shyamveer Dangur, Ravi Dangur's father, said, "This case caused us tremendous mental stress.

We waited 8.7 long years to see my son set free. He was arrested in 2016, and during that time, my daughter got married, but my son was denied bail. We had lost all hope, but my advocate Darshana Tripathy fought well for him. I am thankful to the court."

Premnath Mishra, Abhijit Mishra's father, said, "I am a small-time farmer from Uttar Pradesh. My son was falsely implicated by the police and the complainant. They destroyed his youth—he's now nearly 28 years old. I'll take him back to our native place in Jaunpur as I fear for his safety in Nalasopara."

## Advocates speak

"Finally, we succeeded in securing justice for our client, who was innocent. There needs to be a system in place to prevent innocent people from being wrongfully imprisoned," said advocate Darshana Tripathy, Dangur's lawyer.

Advocate Siddhesh Naik, Mishra's lawyer, said, "Despite the investigating officer's coercive tactics and reliance on false panchnama and witnesses, justice prevailed. The acquittal highlights the importance of upholding the rule of law and protecting individuals from wrongful prosecution."

### 10 mistakes made by the Tulinj police that led to acquittal: Advocate, complainant

1. Failure to retrieve call data records of the accused.
2. Incomplete crime scene investigation and failure to retrieve fingerprints.
3. No CCTV footage was secured for digital evidence.
4. Regular panch witnesses were used instead of locals, despite the crime occurring in a densely populated area.
5. Failure to establish the motive behind the murder.
6. Police failed to prove the "last seen" theory.
7. Other potential angles in the case were not explored.
8. No proof of the seized items was submitted in court.
9. No background check of the deceased and complainant was conducted.
10. No identification parade was conducted.

'My brother was killed just a month after his wedding. His widow is still devastated, and she refuses to remarry. The killers destroyed two lives, yet they have been acquitted. All thanks to the Tulinj police officers'

Chandrashekhar Gupta, the complainant

Mid-Day. 13, 2

# Mahayuti trio battle for Mira-Bhayandar seat

## BJP, Shiv Sena, and NCP all stake claims as Geeta Jain eyes re-election

**PRAJAKTA KASALE**
prajakta.kasale@mid-day.com

ALL three political parties in the Mahayuti alliance took nomination forms for the Mira-Bhayandar Assembly seat on Tuesday, the first day of form distribution. The seat has not yet been allocated to any party, and all three have staked their claim by taking forms.

On Tuesday, a total of 38 nomination forms were distributed for the Mira-Bhayandar Assembly seat. "Of these, four were taken by BJP, three by Shiv Sena, and one by NCP, while nine were distributed to independent candidates," said an Election Commission official. No party from Maharashtra Vikas Aaghadi has taken any forms yet.

Geeta Jain won the seat in 2019 as an Independent after failing to secure a BJP ticket, defeating BJP's Narendra Mehta by 15,526 votes. After her victory, she supported the MVA government and later joined Shinde's Shiv Sena after the previous government collapsed in 2022.

The BJP announced its first list of 99 candidates on Sunday, October 20, but no candidate was mentioned for the Mira-Bhayandar seat. Shiv Sena and NCP have yet to declare any candidates in Maharashtra. Narendra Mehta, who won the seat in 2014, is interested in contesting it again for BJP and is hopeful his name will be announced soon, according to a close associate.

Geeta Jain is also interested in running again and has already begun her campaign. "She proved herself by winning as an Independent. The BJP has committed the seat to her, but if it goes to Sena, she may contest under their banner," said a senior associate of Jain.



-day Wednesday, October 23, 2024 | Mumbai | www.mid-day.com | twitter.com/mid_day | epaper.mid-day.com

# Cops register FIR but teacher roams free

## Educator had told victim's father she had slapped the girl for being mischievous

**Continued from page 1**

AFTER the girl's father approached the police, an FIR was registered against the teacher under relevant sections of the Bhartiya Nyay Sanhita (BNS). However, the teacher has not yet been arrested.

According to reports, the girl lived with her parents and siblings in Oswal Nagari, Nalasopara East. She attended private coaching classes. It is alleged that during a class, the female teacher slapped her on her right cheek for being mischievous. The teacher's hand also struck the girl's ear, causing an injury as she was wearing an earring. The force of the slap caused the earring's tip to pierce the back of her ear, leading to the injury.

**10**
Age of the victim

The girl's father, Ambaram Patel, stated that he initially took his daughter to a local doctor for treatment. Later, he visited a private hospital for further checkups, but her condition did not improve. On October 13, her health worsened—her jaw got locked and she was unable to speak. Desperate, Patel sought treatment at several government hospitals but could not find space, ultimately admitting her to K J Somaiya hospital where she remains unconscious. Doctors have reported that the infection is severe, with recovery expected to take time.

"When I confronted the teacher, she admitted to slapping my daughter because she was being naughty. However, when I informed her about the serious condition my daughter was in, she started apologising. The teacher is responsible for my daughter's condition, so I have filed a complaint against her," Patel said.

Investigating officer, PSI Vinod Waingankar from Tulinj police said a case had been registered and the tuition teacher booked. "Since the case was bailable, no arrest has been made yet. We issued a notice to the teacher."



The girl battling for life in the ICU of a private hospital

Times of India P3

# 10-year-old girl slapped by tuition teacher, in ICU after complaining of hearing loss

Times News Network

**Mumbai:** A 10-year-old girl from Nalasopara, who was allegedly slapped by her tuition teacher early this month, was admitted to the intensive care unit of a private hospital in Mumbai. Her condition is said to be grievous. The teacher received a notice from the Tulinj police.

The incident occurred on Oct 5 when Deepika Patel, a Class V student, was attending the Reena Singh Tutorials in Nalasopara (East). In the midst of teaching, the teacher, Ratna Singh (20), walked up to Deepika and slapped her on the right cheek. Ratna claimed that despite warning her, Deepika continued to cause disturbances in the class.

Deepika went home after finishing her tuitions and complained of pain in the ears. Her father saw that her cheek and ears were swollen. When he probed her, she narrated what happened in the tuition class. Deepika was taken to a private hospital in Virar after she complained of hearing loss. On Oct 13, as Deepika's health showed no improvement, she was moved to a hospital.

Ambaram filed a complaint with the police, who charged Singh under BNS section for rash and negligent act and sections of the Juvenile Justice Act. Police said they issued a notice to the teacher and are recording the statements from other students who attended tuition on Oct 5. Cops said no CCTV was found in the tuition class premises, and they are waiting to record Deepika's statement. Ambaram said he worried about the mounting hospital costs as Deepika continues to be under observation in the ICU. Deepika enrolled for the classes at the beginning of the academic year.

Remarks

Scanned with OKEN Scanner